RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष २, अंक २५] शुक्रवार, जून १७, २०१६/ज्येष्ठ २७, शके १९३८ [पृष्ठे ५, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ३५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**


| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०१६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३.—** महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश ... ... ... ... | १-५ |


## जलसंपदा विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक १७ जून २०१६.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XIII OF 2016.**

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY ACT, 2005.

**सन २०१६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३.**

**महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

२००५ चा महा. १८. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा) अध्यादेश, २०१६, असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम २ च्या पोट-कलम (१) मध्ये, खंड (फ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :— २००५ चा महा. १८.

" (फ-१) " विशेष निमंत्रित " याचा अर्थ, कलम ४ च्या पोट-कलम (१) च्या खंड (च) अन्वये प्राधिकरणावर नियुक्त केलेली व्यक्ती, असा आहे ;".

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मध्ये,—

(क) पोट-कलम (३) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु, राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असे घोषित करता येईल की, प्राधिकरणाचे मुख्यालय हे, उक्त अधिसूचनेत नमूद करण्यात येईल अशा अन्य ठिकाणी असेल. ";

(ख) पोट-कलम (४) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

" (४) प्राधिकरण, अध्यक्ष आणि चार अन्य सदस्य यांचे मिळून बनलेले असेल.".

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ यामध्ये नवीन कलम ३क समाविष्ट करणे.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

प्राधिकरण पुनर्घटित करण्यात येईपर्यंतच्या मधल्या कालावधीमध्ये प्राधिकरणाचे अधिकार, इत्यादींचा वापर करण्यासाठी समिती नियुक्त करण्याचा शासनाचा अधिकार.

" **३क.** या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, कलम ३ च्या पोट-कलम (५) अन्वये प्राधिकरण कोणत्याही कारणामुळे पुनर्घटित करण्यात आले नसेल तेव्हा, शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियुक्त करील अशा, अपर मुख्य सचिवाचे किंवा त्यास समतुल्य असणारे पद धारण करणारी व्यक्ती, जी अध्यक्ष म्हणून काम करील, आणि सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाभक्षेत्र विकास), जलसंपदा विभाग, आणि प्रधान सचिव/सचिव, वित्त विभाग, जे सदस्य म्हणून काम करतील, यांचे मिळून बनलेल्या समितीकडून, प्राधिकरणाचे अधिकार, कार्ये व कर्तव्ये ही, वापरण्यात येतील, करण्यात येतील आणि पार पाडण्यात येतील ; आणि उक्त समिती, सहा महिन्यांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर किंवा प्राधिकरण यथोचितरित्या पुनर्घटित करण्यात येईल तेव्हा, यांपैकी जे अगोदर घडेल त्यानंतर, प्राधिकरणाचे अधिकार वापरण्याचे, कार्ये करण्याचे व कर्तव्ये पार पाडण्याचे बंद करील.".

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याचे कलम ४ बदली दाखल करणे.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

प्राधिकरणाचा अध्यक्ष, अन्य सदस्य आणि विशेष निमंत्रित यांच्या नियुक्तीसाठी अर्हता.

" **४.** (१) प्राधिकरणाचा अध्यक्ष, अन्य सदस्य आणि विशेष निमंत्रित हे, पुढीलप्रमाणे नियुक्त करण्यात येतील :—

(क) अध्यक्ष हा, जी व्यक्ती राज्य शासनाच्या मुख्य सचिवाच्या किंवा त्याच्या समतूल्य दर्जाची राज्य शासनाची अधिकारी आहे किंवा होती अथवा उच्च न्यायालयाची सेवानिवृत्त न्यायमूर्ती आहे, अशी व्यक्ती असेल ;

(ख) एक सदस्य, जो जलसंपदा अभियांत्रिकी क्षेत्रामधील तज्ज्ञ असेल ;

(ग) एक सदस्य, जो अर्थव्यवस्था क्षेत्रामधील तज्ज्ञ असेल ;

(घ) एक सदस्य, जो भूजल व्यवस्थापन क्षेत्रामधील तज्ज्ञ असेल ;

(ङ) एक सदस्य, जो विधि क्षेत्रामधील तज्ज्ञ असेल ; आणि

(च) प्राधिकरणाला सहाय्य करण्यासाठी, ज्यांच्याकडे जलसंपदा, अभियांत्रिकी, कृषि, पारिस्थितीकी व पर्यावरण, पेयजल, उद्योग, कायदा, अर्थशास्त्र, वाणिज्य, वित्त किंवा व्यवस्थापन यांच्याशी संबंधित समस्या हाताळण्याचे पुरेसे ज्ञान, अनुभव असेल किंवा ज्यांनी त्यासंबंधातील क्षमता शाबित केलेली असेल असे, प्रत्येक नदी खोरे प्राधिकरणाच्या क्षेत्रातून एक याप्रमाणे, विहित केल्यानुसार पाच विशेष निमंत्रित असतील :

परंतु, किमान एक विशेष निमंत्रित ही, महिला असेल :

परंतु आणखी असे की, कोणतेही दोन विशेष निमंत्रित हे एकाच क्षेत्रातील किंवा क्षेत्रगटातील असणार नाहीत.

(२) (क) प्राधिकरणाचा अध्यक्ष हा कर्तृत्ववान, प्रामाणिक व प्रतिष्ठित व्यक्ती असेल.

(ख) प्राधिकरणाचे सदस्य ह्या, त्यांच्या क्षेत्राशी संबंधित समस्या हाताळण्याचे पुरेसे ज्ञान, अनुभव असलेल्या आणि त्यासंबंधातील क्षमता शाबीत केलेल्या कर्तृत्ववान, प्रामाणिक व प्रतिष्ठित व्यक्ती असतील :

परंतु, कलम ४ च्या पोट-कलम (१) मधील खंड (ख) ते (च) मध्ये नमूद केलेले सदस्य व तज्ज्ञ यांनी, कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची किंवा संस्थेची स्नातक पदवी इतकी किमान शैक्षणिक अर्हता आणि त्यांच्या क्षेत्राशी संबंधित वीस वर्षांहून कमी नाही इतका कार्यसिद्ध अनुभव धारण केलेला असेल.

(३) प्राधिकरणाचा अध्यक्ष किंवा अन्य कोणताही सदस्य, इतर कोणतेही लाभपद धारण करणार नाही.

(४) वयाची सदुसष्ट वर्षे पूर्ण झालेल्या कोणत्याही व्यक्तीची, अध्यक्ष किंवा अन्य सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात येणार नाही.".

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५ मध्ये,— सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम ५ ची सुधारणा.

(क) पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(१) राज्य शासन कलम ३ च्या पोट-कलम (५) च्या प्रयोजनांसाठी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अध्यक्ष व सदस्य यांची नियुक्ती करण्यासाठी पुढील सदस्यांची मिळून बनलेली एक निवड समिती घटित करील :—

| | |
|---|---|
| (क) मुख्य सचिव. | अध्यक्ष. |
| (ख) सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग. | सदस्य. |
| (ग) सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाभक्षेत्र विकास), जलसंपदा विभाग. | सदस्य. |
| (घ) संचालक, भारतीय तंत्रज्ञान संस्था, मुंबई. | सदस्य. |
| (ङ) प्रख्यात संस्थेमधून शासनाने नामनिर्देशित केलेली एक व्यक्ती. | सदस्य. |
| (च) सचिव (जलसंपदा प्रकल्प व विकास), जलसंपदा विभाग. | सदस्य-सचिव. "; |

(ख) पोट-कलम (६) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

"(७) अध्यक्ष व अन्य सदस्य यांचे रिक्तपद भरण्यासाठीच्या संपूर्ण निवड प्रक्रियेचे सर्व संबंधित तपशील आणि तिचे निकाल जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील.".

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ याच्या कलम ६ ची सुधारणा.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६ मध्ये, पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(१) अध्यक्ष व अन्य सदस्य, आपल्या पदावर रूजू झाल्याच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या मुदतीसाठी पद धारण करतील :

परंतु, कलम ५ च्या पोट-कलम (१) अन्वये घटित केलेल्या निवड समितीच्या शिफारशींवरून अध्यक्ष किंवा अन्य सदस्य यांना पुनर्नियुक्त करता येईल, परंतु, त्यांना लागोपाठ दोन पेक्षा अधिक मुदतींकरिता पुनर्नियुक्त करता येणार नाही :

परंतु आणखी असे की, अध्यक्ष किंवा अन्य सदस्य, त्याच्या वयाची सत्तर वर्षे पूर्ण झाल्यावर पद धारण करणार नाही.".

**निवेदन.**

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ (२००५ चा महा. १८) याच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना येत असलेल्या अडचणी लक्षात घेता आणि उक्त अधिनियमात सुधारणा करण्याच्या आणि तांत्रिकदृष्ट्या व्यवहार्य असतील आणि प्रत्यक्ष व्यवहारात ज्यांची अंमलबजावणी करता येईल अशा सुयोग्य तरतुदी सुचविण्याच्या हेतुने श्री. हि. ता. मेंढेगिरी, भूतपूर्व महासंचालक, जल व भूमी व्यवस्थापन संस्था, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यास गट स्थापन करण्यात आला होता. या अभ्यासगटाने जुलै, २०१४ मध्ये आपला अहवाल शासनाला सादर केला आहे.

२. उक्त अभ्यास गटाच्या शिफारशी लक्षात घेता, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे कार्य अधिक प्रभावी करण्यासाठी, उक्त प्राधिकरणाच्या अध्यक्षाचे अर्हताविषयक निकष सुधारणे व उक्त प्राधिकरणाच्या सदस्यांमध्ये भूजल व्यवस्थापन आणि विधी क्षेत्रामधील तज्ज्ञ व्यक्तींचा समावेश असणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे. त्यानुसार, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ (२००५ चा महा. १८) याच्या प्रकरण दोनमध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदींमध्ये तात्काळ यथोचित सुधारणा करण्याचे ठरविण्यात आले आहे. प्राधिकरण पुनर्घटित करण्यात येईपर्यंतच्या मधल्या कालावधीमध्ये, प्राधिकरणाच्या अधिकारांचा वापर करणे, त्याची कार्ये करणे व कर्तव्ये पार पडणे, यांकरिता योग्य त्या तरतुदी करणेही इष्ट वाटले.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ (२००५ चा महा. १८) यामध्ये महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ; आणि, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक १७ जून २०१६.

**चे. विद्यासागर राव,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**आय. एस. चहल,**
शासनाचे प्रधान सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHENG /2009/35528

# महाराष्ट्र शासन राजपत्र
## असाधारण भाग आठ

वर्ष २, अंक ३९] शुक्रवार, जून १७, २०१६/ज्येष्ठ २७, शके १९३८ [पृष्ठे ५, किंमत : रुपये २७.००

## असाधारण क्रमांक ६२
## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Water Resources Regulatory Authority (Amendment) Ordinance, 2016 (Mah. Ord. XIII of 2016), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRAKASH H. MALI,
Principal Secretary to Government,
Law and Judiciary Department.

[Translation in English of the Maharashtra Water Resources Regulatory Authority (Amendment) Ordinance, 2016 (Mah. Ord. XIII of 2016), published under the authority of the Governor].

**WATER RESOURCES DEPARTMENT**

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 17th June 2016.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XIII OF 2016.**

*AN ORDINANCE*

*further to amend the Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005.*

WHEREAS both Houses of the State Legislature are not in session;

AND WHEREAS the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005, for the purposes hereinafter appearing;

Mah. XVIII of 2005.

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by clause (*1*) of article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to promulgate the following Ordinance, namely :—

Short title and commencement.

**1.** (*1*) This Ordinance may be called the Maharashtra Water Resources Regulatory Authority (Amendment) Ordinance, 2016.

(*2*) It shall come into force at once.

Amendment of section 2 of Mah. XVIII of 2005.

**2.** In section 2 of the Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005 (hereinafter referred to as " the principal Act "), in sub-section (*1*), after clause (*v*), the following clause shall be inserted, namely :— Mah. XVIII of 2005.

" (*v-1*) " Special Invitee " means a person appointed to the Authority under clause (*f*) of sub-section (*1*) of section 4 ;".

Amendment of section 3 of Mah. XVIII of 2005.

**3.** In section 3 of the principal Act,—

(*a*) to sub-section (*3*), the following proviso shall be added, namely :—

" Provided that, the State Government may, by notification in the *Official Gazette*, declare that the head office of the Authority shall be at such other place as mentioned in the said notification. ";

(*b*) for sub-section (*4*), the following sub-section shall be substituted, namely :—

"(*4*) The Authority shall consist of a Chairperson and four other Members.".

Insertion of new section 3A in Mah. XVIII of 2005.

**4.** After section 3 of the principal Act, the following section shall be inserted, namely :—

Power to appoint Committee to perform powers, etc., of Authority during intervening period when Authority is not reconstituted.

"**3A.** Notwithstanding anything contained in this Act, when the Authority cannot be reconstituted under sub-section (*5*) of section 3, for whatsoever reason, the powers, functions and duties of the Authority may be exercised, performed and discharged by a Committee, to be appointed by the Government, by notification in the *Official Gazette*, consisting of persons holding the post of the Additional Chief Secretary or equivalent thereto, who shall act as a Chairperson and the Secretary (Water Resources Management and Command Area Development), Water Resources Department and Principal Secretary/Secretary, Finance Department, who shall act as Members thereof; and the said Committee shall cease to exercise the powers, perform the functions and discharge the duties of the Authority after expiry of a period of six months or when the Authority is duly reconstituted, whichever is earlier.".

Substitution of section 4 of Mah. XVIII of 2005.

**5.** For section 4 of the principal Act, the following section shall be substituted, namely :—

Qualifications for Chairperson, other Members and Special Invitees of Authority.

**"4.** (*1*) The Chairperson, the Members and Special Invitees of the Authority shall be appointed as follows :—

(*a*) the Chairperson shall be a person who is or who was the Officer of the State Government of the Rank of Chief Secretary to the State Government or equivalent thereto or Retired High Court Judge ;

(*b*) one Member shall be expert from the field of water resources engineering ;

(*c*) one Member shall be expert from the field of economics ;

(*d*) one Member shall be expert from the field of groundwater management ;

(*e*) one Member shall be expert from the field of law ; and

(*f*) five Special Invitees as may be prescribed shall be, one from each River Basin Agency area, having adequate knowledge, experience or proven capacity in dealing with the problems relating to water resources engineering, agriculture, ecology and environment, drinking water, industry, law, economics, commerce, finance or management for assisting the Authority:

Provided that, at least one Special Invitee shall be a woman:

Provided further that, no two Special Invitees shall be from the same field or group of fields.

(*2*) (*a*) The Chairperson of the Authority shall be the person of ability, integrity and standing.

(*b*) The Members of the Authority shall be persons of ability, integrity and standing who have adequate knowledge of, experience in, and proven capacity in, dealing with problems relating to their respective fields :

Provided that, the Members and experts mentioned in clauses (*b*) to (*f*) of sub-section (*1*) of section 4 shall have minimum educational qualification of bachelor's degree of any recognized university or institute and experience of not less than twenty years with proven track record in their respective fields.

(*3*) The Chairperson or any other Member of the Authority shall not hold any other office of profit.

(*4*) No person shall be appointed as the Chairperson or other Member, if he has attained the age of sixty-seven years.".

**6.** In section 5 of the principal Act,— Amendment of section 5 of Mah. XVIII of 2005.

(*a*) for sub-section (*1*), the following sub-section shall be substituted, namely :—

" (*1*) The State Government shall, by notification in the *Official Gazette*, for the purposes of sub-section (*5*) of section 3, constitute a Selection Committee, for appointment of the Chairperson and Members consisting of,—

| | | | |
|---|---|---|---|
| (*a*) | the Chief Secretary. | ... | President. |
| (*b*) | the Secretary, Water Supply and Sanitation Department. | ... | Member. |
| (*c*) | the Secretary (WRM & CAD), Water Resources Department. | ... | Member. |
| (*d*) | the Director, Indian Institute of Technology, Mumbai. | ... | Member. |
| (*e*) | One person nominated by the Government from an eminent institute. | ... | Member. |
| (*f*) | the Secretary (WRP & D), Water Resources Department. | ... | Member-Secretary."; |

(*b*) after sub-section (*6*), the following sub-section shall be added, namely :—

" (*7*) All relevant details of the complete selection process and its outcome for filling up of the vacancy of the Chairperson and other Members, shall be published on the website of the Water Resources Department.".

Amendment of section 6 of Mah. XVIII of 2005.

**7.** In section 6 of the principal Act, for sub-section (*1*), the following sub-section shall be substituted, namely :—

"(*1*) The Chairperson and other Members shall hold office for a term of three years from the date on which he enters upon his office :

Provided that, the Chairperson or the other Member may, on the recommendations of the Selection Committee constituted under sub-section (*1*) of section 5, be re-appointed but for not more than two consecutive terms :

Provided further that, no Chairperson or other Member shall hold office after he has attained the age of seventy years. ".

STATEMENT

In view of difficulties being faced while implementing the provisions of the Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005 (Mah. XVIII of 2005) and with an intention to amend the said Act and to suggest the suitable provisions which may be technically feasible and can be implemented in actual practice, the Study Group was constituted under the Chairmanship of Shri H. T. Mendhegiri, former Director General, Water and Land Management Institute, Aurangabad. The Study Group has submitted its report to the Government in July 2014.

2. After considering the recommendations of the said Study Group, the Government is of the view that in order to make the functioning of the Maharashtra Water Resources Regulatory Authority more effective, it is necessary to revise qualifying criteria of the Chairperson and to have experts from the fields of ground water management and law to be the Members of the said Authority. Accordingly, it has been decided to immediately amend the provisions contained in Chapter II of the Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005 (Mah. XVIII of 2005), suitably. It is also considered expedient to make suitable provisions for exercise of the powers, performance of the functions and discharging of the duties of the Authority, during the intervening period, till the Authority is reconstituted.

3. As both Houses of the State Legislature are not in session and the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005 (Mah. XVIII of 2005), for the purposes aforesaid, this Ordinance is promulgated.

Mumbai,
Dated the 17th June 2016.

CH. VIDYASAGAR RAO,
Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

I. S. CHAHAL,
Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.